FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com www.FirstRanker.com

This Question Paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No.
अनुक्रमांक

Code No. 49/S/O/M
कोड नं.

Set A

# MARATHI
# ( मराठी )
# (204)

Day and Date of Examination
( परीक्षेचा दिवस आणि तारीख ) ______________________

Signature of Invigilators 1. ______________________
( निरीक्षकाची सही )
2. ______________________

**सामान्य अनुदेश :**

1. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठांवर आपला अनुक्रमांक लिहावा.
2. कृपा करुन प्रश्न-पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठांवर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्या पण क्रमिक रुपात असावी.
3. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायातून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर-पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.
4. बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
5. उत्तर-पत्रिकेत आळेख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परिक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
6. आपल्या उत्तर-पत्रिकांवर प्रश्न-पत्रिकेचा कोड संख्या **49/S/O/M** लिहावेत.



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com

FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com www.FirstRanker.com

# MARATHI

## ( मराठी )

## (204)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**निर्देश :**

1. **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. **सर्व** प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच उत्तरे लिहावीत.
3. प्रश्न 1 ते 11 पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

1. झेल्याला कोणती माणसे आवडत होती ? 1

(A) शूर (B) मोठी (C) धाडसी (D) बोलकी

2. पुढे दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय ओळखा. 1

(A) परीस्थिती (B) परिस्थीती (C) परीस्थिति (D) परिस्थिती

3. खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून भरा. 1

'हा तिमिर घोर ..................'

(A) संहारिन (B) संव्हारीन (C) सहारिन (D) संहारीन

4. पुढील कुठल्या वाक्यात सर्वनाम आले आहे ? 1

(A) राम परवा येईल. (B) मुकेश हुशार आहे.

(C) तो वर्गात पहिला येतो. (D) रोहित अभ्यास करीत नाही.



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com

FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com www.FirstRanker.com

5. 'मातृशक्तीचे महत्त्व' या पाठाचे लेखक कोण? 1

(A) विनोबा भावे (B) द.मा. मिरासदार

(C) लोकमान्य टिळक (D) वि.स. खांडेकर

6. पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा. 1

'कोवळी पाने सुंदर दिसतात.'

(A) विशेषण (B) सर्वनाम

(C) नाम (D) यापैकी काही नाही

7. तळ्यांतील इतर बदके 'त्या' बदकाला काय म्हणत असत? 1

(A) वेडे (B) बावळट (C) भित्रे (D) रडे

8. योग्य पर्याय भरुन वाक्य पूर्ण करा. 1

'................ शपथ घालितो तुजला'

(A) गळ्याची (B) नदीची (C) भूमातेची (D) तद्‌विरहाची

9. हिंदुस्थानचा दक्षिण भाग कसा असेल असे लेखकाला वाटत होते? 1

(A) लहान (B) चिंचोळा (C) विस्तीर्ण (D) चिमुकला

10. महात्मा फुले यांनी वर्णिलेला शेतकरी कसा होता? 1

(A) गरीब (B) श्रीमंत (C) लबाड (D) भ्रष्ट

11. 'कापणी' या कवितेचे कवी कोण? 1

(A) ग.दि.मा. (B) बालकवी

(C) मंगेश पाडगावकर (D) इंद्रजित भालेराव



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com

**12.** योग्य पर्याय भरुन वाक्य पूर्ण करा. 1

'सकळ लोक एक करावे। गलीम __________ काढावे'.

**13.** पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा. 1

'तुम्ही सर्वजण खाली जा'

**14.** एखादे दिवशी मागूनही अन्न मिळाले नाही तर डोंबारी काय खातात ? 1

**15.** सामान्य माणसे संतांना का हसतात ? 1

**16.** खालील वाक्यातील क्रियापद ओळखा व त्याचा काळ कोणता आहे ते सांगा ? 1

(i) ती संध्याकाळची वेळ होती.

(ii) सोन्याचा भाव उद्या वाढेल.

**17.** सूर्याकडे पाठ फिरवून शतकाचा प्रवास कुणी केला ? 1

**18.** कवी नक्षत्रांना कोणता प्रश्न विचारतो ? 1

**19.** अंधारावर कुणाची पाऊलचिन्हे उमटतात ? 1

**20.** पुढे दिलेल्या शब्दसमुहाबद्दल एक शब्द सूचवा. 1

(i) कधीही मृत्यू न येणारा.

(ii) विद्यार्थ्यांसाठी राहण्याची जागा.

**21.** 'तू तर माझ्याही पुढे गेलीस' असे कोण कुणास म्हणतो ? 1

**22.** वि.स. खांडेकर देवळात का जातात ? 1



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com

23. (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन-दोन समानार्थी शब्द लिहा : 2

(i) समुद्र (ii) भांडण

(ब) खालील शब्दांचे विरुध्दार्थी शब्द लिहा : 2

(i) उपकार (ii) आदर (iii) इष्ट (iv) सुकाळ

24. खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

जीवनाची कला खांबासारखे उभे राहून सडण्यामधे नाही. हे झाड ऐन उमेदीतच सडून गेले, का ते माहीत आहे? कारण याच्या मुळांनी रस घेणे बंद केले होते. जीवनात तरारण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे त्याला वेगवेगळ्या रसांचे ग्रहण करु द्या. एका विशेष विषयात निपुण होण्याचा अर्थ असा नाही की तुम्ही फुटबॉलच्या ग्राउंडवर जाऊ नका; व्यापारात इतके तल्लीन होऊन जाऊ नका की मुलांना विसरुन जा; पुस्तकांतले इतके किडे बनू नका की इष्ट मित्रांचे खिदळणे नकोसे वाटेल. जीवनांत वेगवेगळे रस घ्यायला शिका आणि इतका रस घ्या की म्हातारपणच्या सुरकुत्यांमधे उदासीनता आणि निराशेची एकही सुरकुती न पडावी. असे रहावे की कंठात संगीत असेल, ओठावर स्मित असेल, डोळ्यांत हसू असेल, हृदयांत ऊर्मी असेल आणि अशा तऱ्हेने गात-गात पुढे जा, हसत-हसत भेटा आणि स्मित करीत निरोप घ्या.

**प्रश्न :**

(i) या उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. 1

(ii) 'जीवनात वेगवेगळे रस घ्यायला शिका' याचा अर्थ काय? 2

(iii) कसे रहावे? 1

25. खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

'संतांचा अनुभव संतची जाणती। येर ते हासति अभाविक ।। 1 ।।
नामाचा प्रभाव प्रल्हादचि जाणे। जन्म मरण येणे खुंटियेले ।। 2 ।।
सेवेचा प्रकार जाणे हनुमंत। तेणे सीताकांत सुखी केला ।। 3 ।।
सख्यत्वे पूर्णता अर्जूना बाणली। ऐक्य रुपे चाली मिरविला ।। 4 ।।
चोखा म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार। तेथे मी पामर काय वानू ।। 5 ।।'

**प्रश्न :**

(i) नामस्मरणाने भक्त प्रल्हादाला काय मिळाले? 1

(ii) सामान्य माणसे संतांना का हसतात? 1

(iii) संत चोखामेळा यांनी संताच्या श्रेष्ठ आचरणाचे स्वरुप कोणत्या उदाहरणांतून स्पष्ट केले आहे? 2



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com

FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com www.FirstRanker.com

**26.** खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(i) केशवने कोलकाता येथे शिक्षण घेण्याचे का ठरविले? 2

(ii) आचार्य विनोबा भावे यांच्या मते समाजात स्त्री-पुरुष भेदभाव कसा केला जातो? 2

**27.** (i) महात्मा फुले यांना शेतकऱ्यांची कोणकोणती दु:खे सांगितली आहेत? 3

(ii) डॉ. अब्दुल कलाम कोणते आवाहन करतात? 3

**28.** (अ) डोंबारी कसे जीवन जगत आहेत? 2

(ब) पावसाच्या धारा बरसल्यानंतर सृष्टीतील कोणती रूपे कवीला मोहित करतात? 2

**29.** ससंदर्भ स्पष्टीकरण करा :

(अ) 'देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत। वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावण महिन्याचे गीत।' 3

(ब) कवयित्री या देशाच्या मातीची महती कशी सांगत आहे? 3

**30.** (अ) 'पत्राबद्दल' वि.स. खांडेकरांनी वाचकांची उत्सुकता कशी वाढविली? पाठाचे नाव लिहा. 3

(ब) 'कापणी' या कवितेत ''सोनं आणि माती पदरांत घेते'' असे घरधनीण का म्हणते? 3

**31.** (अ) ''बलसागर भारत होवो'' कवितेत कवीने कोणती आकांक्षा व्यक्त केली आहे? व त्यासाठी कोणता त्याग करायची तयारी दाखविली आहे? कवीचे नाव लिहा. 3

(ब) भाषेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजेत, असे टिळकांना वाटते? पाठाचे नाव लिहा. 3



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com

FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com www.FirstRanker.com

32. बऱ्याच दिवसांनी तुमची आजी तुमच्या घरी आली. तिच्याशी तुमचा संवाद 8 ते 10 वाक्यांत लिहा. 4

33. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा : 10

(शब्द मर्यादा – 200 शब्द)

(i) संतांचे महत्त्व

(ii) पुस्तकाचे आत्मवृत्त

(iii) माझा प्रिय मित्र

(iv) जीवनात शिक्षणाचे महत्त्व

34. या पाठ्य पुस्तकातील सर्वात अधिक कोणता पाठ तुम्हाला आवडला ? का आवडला ? त्या पाठाचे व लेखकाचे नाव लिहा. 4

35. पत्र लेखनाचे नियम कटाक्षाने पाळून खालीलपैकी एका विषयावर पत्र लिहा. 8

दिल्लीचे बदललेले स्वरुप पाहण्यासाठी तुमच्या मित्रास आमंत्रित करण्यासाठी पत्र लिहा.

**किंवा**

परीक्षेच्या दिवसांत वीजप्रवाह वारंवार खंडित होत असल्याची तक्रार विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यास लिहा.



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com

FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com www.FirstRanker.com

36. खालील उतारा लक्षपूर्वक वाचा. त्याचे स्वत:च्या शब्दांत एक तृतीयांश सारांश लेखन करा व उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. 4

मनुष्याच्या आहारवस्तू कष्टसाध्य आहेत. त्याची उपभोग इच्छा अमर्याद आहे. एवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणे ध्यानांत आल्या म्हणजे त्यास इतर प्राण्यांपेक्षा शेकडोपट अधिक उद्योग का केला पाहीजे, हे सहज समजणार आहे. हे ज्यास पक्के समजून येईल, तो निरुद्योगी होणार नाही. तो उद्योगी होईल. इतकेच नाही तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्याचे सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग, करून आयुष्य घालविणे शक्य आहे, पण कोणत्याही कारणाने उद्योगी मनुष्याशी गाठ पडल्यास, एक तर त्याच्या प्रमाणे उद्योग करण्यास किंवा त्याच्या अधीन होऊन तो ठेवील त्या स्थितीत राहण्यास तयार झाले पाहिजे. आमचे भावी स्वातंत्र्य अथवा आमचे निरंतर दास्य, सर्वथैव आमच्यावर अवलंबून आहे.

37. खालील माहितीच्या आधारे प्रवाह चार्ट तयार करा. 4

जमीन नांगरणे, मशागत करणे, पेरणी, पिकातील तन काढणे, राखणी, कापणी, धान्य तयार करणे (मळणी).

- o O o -

firstranker.com
www.FirstRanker.com



FirstRanker.com
Firstranker's choice
www.FirstRanker.com